महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
चेहेडी (बु),सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१
दुरध्वनी क्रमांक . (०२५३) २४६१४७९
ई मेल ronashik@dtemaharashtra.gov.in सकेतस्थळ - www.dtensk.org

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०२६/ 1216 दिनांक:- 09 JUN 2026

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित
पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक अंतर्गत सर्व संस्था.

विषय:- नायलॉन मांजामुळे नागरिकांना होणाऱ्या अपघातामुळे होणाऱ्या नुकसानाच्या भरपाईबाबतचे धोरण...
संदर्भ:- मा.संचालनालय यांचे पत्र क्र. DTEM-D170TEQP/118/2026-DESK-17, दि.०२.०६.२०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक ०१ मार्च,२०२३ रोजीच्या अधिसूचनेव्दारे नायलॉन मांजाच्या उत्पादन, विक्री,साठवणूक व वापरास प्रतिबंध केला आहे. तसेच,मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०२/०३/२०२६ रोजी आयोजित बैठकीमध्ये नायलॉन मांजामुळे होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जनजागृती वाढविणे तसेच नुकसान भरपाई धोरणाबाबत विचारविनिमय करण्यात आला असून त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.संचालनालयाच्या संदर्भिय पत्राव्दारे या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या महाविदयालयात नायलॉन मांजाच्या बापरामुळे होणारे धोके, अपघात व त्याचे दुष्परिणाम याबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रम आपल्या स्तरावरून राबविण्यात यावेत. विशेषत: विदयार्थ्यांमध्ये सुरक्षितता,पर्यावरण संरक्षण व कायदेशीर तरतुदी याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी व्याख्याने,जनजागृती अभियान,पोस्टर स्पर्धा, प्रतिज्ञा उपक्रम, माहितीपत्रके तसेच इतर योग्य उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

तसेच, संस्थास्तरावर राबविण्यात आलेल्या जनजागृती उपक्रमांचा आढावा घेउन त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, जेणेकरून सदर अहवाल संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

सोबत - संदर्भीय नमूद पत्र.

(डॉ. गोरक्ष विठोबा गर्जे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४९/४६६/४१९
ई-मेल--desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: DTEM-D170TEQP/118/2026-DESK17 दिनांक: ०२ जून, २०२६

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

**विषय: नायलॉन मांजामुळे नागरिकांना होणाऱ्या अपघातामुळे होणारे नुकसानाच्या भरपाईबाबतचे धोरण.**

**संदर्भ:** शासन पत्र क्र. संकिर्ण-२०२६/ (अ.नौ.सं. क्र.०९(१६२८७९४)/तांशि-२, दि. २४/०४/२०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन पत्राच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नायलॉन मांजाच्या उत्पादन, विक्री, साठवणूक व वापरास प्रतिबंध केला आहे. तसेच, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२/०३/२०२६ रोजी आयोजित बैठकीमध्ये नायलॉन मांजामुळे होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जनजागृती वाढविणे तसेच नुकसान भरपाई धोरणाबाबत विचारविनिमय करण्यात आला असून सर्व संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर बाबीच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अनुदानित व स्वायत्त तंत्र शिक्षण संस्थांना नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणारे धोके, अपघात व त्याचे दुष्परिणाम याबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्याबाबत सूचित करावे. विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षितता, पर्यावरण संरक्षण व कायदेशीर तरतुदी याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी व्याख्याने, जनजागृती अभियान, पोस्टर स्पर्धा, प्रतिज्ञा उपक्रम, माहितीपत्रके तसेच इतर योग्य उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

तसेच, संस्थास्तरावर राबविण्यात आलेल्या जनजागृती उपक्रमांचा आढावा घेऊन त्याबाबतचा संक्षिप्त अहवाल आपले कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्याबाबत संबंधित संस्थांना निर्देश द्यावेत.

(डॉ. सुनिल भामरे)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत : माहितीस्तव सादर.**
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०००३२